नियमित दिवाणी मुकदमा क्र.४४९/२०१२ मधील नि.४२ वरील आदेश

CNR No.MHST150011962012

०१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी वादी क्र.२ च्या नावापुढे मयत असा शब्द लिहून त्यांचे वारस म्हणून वादी क्र.२अ ते २क असे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ होवून व त्यांच्या विरूध्द पारित झालेला उपशमनाचा आदेश रददबातल होवून व तसे त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी सामील करण्यात येवून त्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, वादी क्र.२ रघुनाथ जगन्नाथ मोहिते हे दि.३१.०७.२०२१ रोजी साातारा येथील हॉस्पीटलमध्ये मयत झाले आहेत. वादी क्र.२ यांना वारस म्हणून दोन मुले व पत्नी असे वारस आहे. वादीच्या कथनानुसार, वादी क्र.२ हे कोव्हीड आजाराने मयत झाले आहेत. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये कोव्हीड या महामारीचा प्रादुर्भाव असल्यामुळे वडूज न्यायालयात येता आले व त्यांचे वारस अभिलेखावर घेता आले नाहीत. वादीच्या कथनानुसार, सदर कालावधीमध्ये वडूज न्यायालय बंद असल्यामुळे त्यांना सदर अर्ज देणेस विलंब झालेला आहे व त्यामुळे त्म्यांच्या विरूध्द उपशमनाचा आदेश पारित झाला असून तो रद्दबातल होवून मयत वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी व तशी दुरूस्ती करणेस परवानगी मिळून सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास नि.४९ वर म्हणणे दाखल करून सदर अर्जास सक्त हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, वादी यांनी सदर अर्जात कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण नमूद केलेले नाही. तसेच वादी यांनी विलंब माफीचा, उपशमनाचा व वारस अभिलेखावर घेणेचा अर्जाचा मजकूर हा सदर एकच अर्जात नमूद केला आहे. तसेच वादी यांना वादी क्र.२ हे मयत झाल्याची माहिती असून देखील सदर दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकणेसाठी विलंब केलेला आहे व त्याचा खुलासा देखील केलेला नाही, त्यामुळे प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. विकल्पेकरून अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादी यांनी प्रतिवादी यांना जास्तीत जास्त खर्चाची रक्कम देणेची विनंती केली आहे.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा यूक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुत अर्जाचे व वादी यांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. वादीने

प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठराव, निरंतर ताकीद व कब्जा काढून मिळणेसाठी तसेच दरम्यानचे उत्पन्न मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील कारणे लक्षात घेता, दाव्याचा निकाल अंतिम गुणवत्तेवर होणेसाठी वादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. मात्र याठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, तसेच, वादी यांनी अर्जात अपेक्षिलेप्रमाणे वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेतल्यास व तशी दुरूस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही तर न्यायनिवाडयासाठी तांत्रीक अडचण राहणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. मात्र वादी यांना सदरचा अर्ज देणेस जो विलंब झालेला आहे त्यासाठी फार वादी यांनी प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. नि.४२ वरील अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादी यांनी वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंबाबाबत प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम रू.२००/- देणेची आहे.

३. वादी यांनी प्रतिवादी यांना उपरोक्त नमूद खर्चाची रक्कम दिल्यानंतर अर्जात अपेक्षिले प्रमाणे मूळ दाव्यात वादी क्र.२ चे वारसांना मुदतीत सामील करून तशी दुरूस्ती प्रत प्रतिवादी यांना देणेची आहे.

दि.१९.८.२०२२. (जी. एम. निमदेव)
वडूज. २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, वडूज.